'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० | मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com

* वर्ष २ रे * अंक ५० वा * रविवार दि. १४ सप्टेंबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## सीपी राधाकृष्णन नवे उपराष्ट्रपती!

**नवी दिल्ली |** जगदीप धनखड यांनी अधिवेशनकाळातच अचानक राजीनामा दिल्याने उपराष्ट्रपतीपदासाठी आज मतदान झाले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन हे विजयी झाल्याची घोषणा करण्यात आली आहे. इंडिया आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी सुदर्शन रेड्डी हे उमेदवार होते.एकूण मतदान ७६८ झाले होते, परंतू १५ मते अवैध ठरली आहेत. सीपी राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली आहेत. तर बी सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली आहेत.

# ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे आरक्षण जाहीर

अहिल्यानगर : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे राज्याचे सर्वांचे लक्ष असते. कारण ही निवडणूक फक्त ग्रामीण भागाच्या कारभाराशी निगडित नसून, पुढील मोठ्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांचा पाया ठरते. त्यातही जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण ही प्रत्येक पक्षासाठी निर्णायक बाब ठरते. अखेर राज्य शासनाने ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांसाठी आरक्षणाची घोषणा केली आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद यंदा अनुसूचित जमाती (म हिला) या गटासाठी राखीव ठेवण्यात आलं आहे. हा निर्णय स्थानिक राजकीय समीकरणांना अक्षरशः हादरवून टाकणारा आहे. कारण जिल्ह्यातील बहुतांश प्रमख

राजकीय घराणी सर्वसाधारण व मागास प्रवर्गातून नेतृत्व करत आली आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्गाचा राजकीय प्रतिनिधित्वाचा पाया येथे तुलनेने दुर्बल राहिला आहे. त्यामुळे



या आरक्षणामुळे अनेक दिग्गजांची स्वप्ने घळीस मिळाली आहेत.

पुणे, रायगड, नाशिक, सिंधुदुर्ग आणि जळगावसारख्या मोठ्या जिल्ह्यांत अध्यक्षपद सर्वसाधारण गटासाठी राखीव ठेवलं गेलं आहे.

### पंचायत समिती सभापतीपदाचे आरक्षण जाहीर


अहिल्यानगर जिल्ह्यातील पंचायत समित्यांसाठी सभापतीपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. यामध्ये अनुसूचित जातीसाठी १, अनुसूचित जाती (महिला) १, अनुसूचित जमाती (महिला) १, नागरिकांचा मागास प्रवर्ग २, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) २, सर्वसाधारण प्रवर्ग ३ आणि सर्वसाधारण प्रवर्ग (महिला) ३ अशी एकूण १३ सभापती पदांची आरक्षणे निश्चित करण्यात आली आहेत. दरम्यान, कोणत्या पंचायत समितीसाठी कोणते आरक्षण लागू होणार आहे, याचा तक्ता अद्याप जाहीर झालेला नाही. त्यामुळे पंचायत समित्यांमध्ये राजकीय समीकरणे कशी बदलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**(पान २ वर)**


### अहिल्यानगरची स्थिती

अडीच वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका रखडल्या आहेत. जिल्हा परिषदेचे ७५ गट आणि पंचायत समित्यांचे १५० गण झाले आहेत. २०१७ च्या निवडणुकीत अनुक्रमे ७३ गट आणि १४६ गण होते. इतक्या काळानंतर होणाऱ्या या निवडणुकीत अध्यक्षपदाच्या आरक्षणामुळेच स्थानिक राजकीय चित्र पालटणार आहे.

**नवी कोरी पुस्तकं**




**चाकोरीपलीकडच्या**
: लेखकाचे नाव :
**संपा. रहाणे, कसबे, पवार, वाकचौरे, लामखडे**
किंमत रु. : ३५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**संदर्भासह एकांकिका**
: लेखकाचे नाव :
**संपा.शीतलपावसकर-भोसले**
किंमत रु. : २५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

## संक्षिप्त

### पुरंदर येथे एक नवीन आयटी पार्क उभारणार

**पुणे** : पुण्यातील हिंडवडी येथील आयटी पार्क हे भारतातील सर्वात मोठ्या आयटी पार्कपैकी एक आहे. हिंडवडी आयटी पार्कमध्ये शेकडो नॅशनल तसेत इंटरनॅशनल आयटी कंपन्या आहेत. हिंडवडीच्या आयटी पार्कमध्ये कोट्यावधीची उलाढाल होते. हिंजवडीवरील ताण कमी करण्यासाठी आणि स्थानिक पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुणे विमानतळाजवळील पुरंदर येथे एक नवीन आयटी पार्क उभारण्याची तयारी सुरु केली आहे, असल्याची माहिती समोर आली आहे.

## मतांची चोरी करुन जिंकले!

### भाजपच्या आजी-माजी खासदारांमध्ये जुंपली

**नवी दिल्ली:** काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मत चोरीचा आरोप करत वातावरण तापवलं. यानंतर आयोगाला स्पष्टीकरण देण्यासाठी पत्रकार परिषद घ्यावी लागली. पण त्यानंतरही अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. त्यानंतर भाजपच्या आजी-माजी खासदारांमध्ये मत चोरीवरुन जुंपली आहे. खासदार राजीव प्रताप रुडी मत चोरी करुन विजयी झाल्याचा आरोप त्यांच्याच पक्षाचे माजी खासदार संजीव बालियान यांनी केला आहे. त्यामुळे भाजपमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडियाच्या निवडणुकीत भाजपचे खासदार राजीव प्रताप रुडी यांनी संजीव बालियान यांचा पराभव केला. त्यात रुडी यांनी बालियान यांचा १०२ मतांनी पराभव केला.

**(पान २ वर)**

## दिशा पाटनीच्या घराबाहेर गोळीबार

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री दिशा पाटनीच्या बरेली येथील घराबाहेर गुरुवारी गोळीबार झाला. या घरात सध्या दिशा पाटनीचे वडील, निवृत्त डिप्टी एसपी जगदीश पाटनी राहतात. शुक्रवारी साडेचार वाजताच्या सुमारास दोन अज्ञात इसम मोटरसायकलवरून आले आणि परिसरातील घराच्या मुख्य दरवाजावर तसेच भिंतीवर चार-पाच फायरिंग केली. गँगस्टर रोहित गोदारा आणि गोल्डी ब्रार गँगने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.

## नेपाळमध्ये राजकीय उलथापालथ; कार्की नव्या पंतप्रधान

**काठमांडू :** नेपाळमधील आंदोलनानंतर तेथील राजकीय स्थित्यंतरे बदलली असून सत्तांतर झाल्याचं पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावरील बंदी निमित्त ठरल्यानंतर झालेल्या आंदोलनात आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेत पंतप्रधानांसह अनेक मंत्र्यांवर हल्लाबोल केल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, नेपाळचे माजी पंतप्रधान केपी ओली शर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत पळ काढला होता. त्यानंतर, नेपाळच्या पंतप्रधानपदावर कोण विराजमान होणार याची चर्चा जगभरात होती. आता, नेपाळच्या अंतरिम पंतप्रधानपदासाठी सुशीला कार्की यांची निवड करण्यात आली आहे. नेपाळमधील जेन झी आंदोलनाचे नेते बालेन शाहा यांचे नाव पंतप्रधानपदासाठी आघाडीवर होते, पण सुशीला कार्की यांची वर्णी लावली आहे.

नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी सुशीला कार्की यांना पंतप्रधानपदाची शपथ दिली.

**(पान २ वर)**



### हिंसाचारानंतर पंतप्रधानांचा राजीनामा

सोशल मीडियावरील बंदी सरकार उलथवण्यासाठी कारणीभूत ठरली. येथील संतापजनक आंदोलनादरम्यान अनेक शहरांत हिंसाचार झाला. संसद भवन, नेत्यांची निवासस्थाने आणि सरकारी कार्यालयांवर आंदोलकांनी तोडफोड केली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही युवकांचा मृत्यू झाल्याने परिस्थिती अधिकच चिघळली. त्यामुळे ओलींवर सतत दबाव वाढत होता. अखेर ओलींनाही सत्ता सोडावी लागली.

## मराठा-कुणबी आरक्षणाला हायकोर्टात आव्हान

### जरांगे पाटलांना धक्का: दोन याचिका दाखल

**मुंबई :** मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळावे, यासाठी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर आणि सातारा गॅझेटियरच्या आधारे २ सप्टेंबर रोजी जीआर काढला. मात्र यानंतर ओबीसी समाज मात्र अस्वस्थ झाला आहे. आपलं आरक्षण जातेय कि काय? आपल्यात नवीन वाटेकरी येतात कि काय? अशी भीती ओबीसी समाजाला वाटत आहे. आता हैदराबाद गॅझेटबाबत मोठी अपडेट्स समोर येत आहेत. सरकारने हैदराबाद गॅझेटबाबत



काढलेल्या जीआर विरोधातच आता मुंबई हायकोर्टात दोन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मराठा समाज आणि मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी हा पहिला धक्का मानला जात आहे.

**(पान २ वर)**

### खोटी प्रमाणपत्र जात बदलू शकत नाही

“मुख्यमंत्री फडणवीस यांचा आदर, त्यांचा हेतू चांगला असेल. मात्र ज्या पद्धतीने त्याच ड्राफ्टींग झालं, वकिलांच म्हणणं हे फार अडचणीच आहे. पहिला जीआर हातात दिला, त्यात मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देता येईल. मात्र जरांगे यांनी सांगितलं की पात्र हा शब्द काढा. लगेच तो शब्द काढला. कुळातील नाते संबंध आणि नातेवाईक यात फरक आहे. नातेवाईक रक्ताच्या नात्यात असतात. नाते संबंध कुठेही असू शकतात. असे प्रतिज्ञापत्र देऊन मराठा समाजाला आपण ओबीसी ठरवायला लागतो. मात्र सुप्रीम कोर्ट आणि आयोगाने सांगितला आहे की असे देता येणार नाही. खोटी प्रमाणपत्र जात बदलू शकत नाही. सामाजिक रित्या मराठा समाज मागास नाही. राजकीय दबावापोटी ते सामाजिक दृष्ट्या मागास आहे, हे ठरवू शकत नाही.

**- छगन भुजबळ**

## मराठा समाजाला गॅझेट लागू केल्याने तरुणाची आत्महत्या

### सरकारने घात केला | आत्महत्या करण्यापूर्वी खिशात चिठ्ठी

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील वांगदरी गावातील ३५ वर्षीय तरुण भरत महादेव कराड याने ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निषेधार्थ मांजरा नदीच्या पात्रात उडी मारून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेनंतर राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ हे आज, १२ सप्टेंबर २०२५ रोजी तातडीने लातूरला



जाऊन आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करणार आहेत.

भरत कराडेने मृत्यूपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये लिहिलं की, ''मी भरत महादेव कराड आताच मराठा समाजाला हैदराबाद गॅजेट लागू केल्यामुळे ओबीसींचे आरक्षण कायमस्वरुपी संपवले आहे. मी वेळोवेळी ओबीसी आक्षण बचाव आनंदोलनात सहभाग घेतला होता. तरीही सरकारने ओबीसी समाजाचा घात करून ओबीसी विरोधी जीआर काढल्यामुळे मी माझे जीवन कायमस्वरूपी संपवत आहे. माझ्या पाठीमागे तरी माझ्या कुटुंबाला आणि ओबीसी समाजाला न्याय मिळावा.''

**(पान २ वर)**

## हवाई दलाला ११४ राफेल लढाऊ विमानांची आवश्यकता

### मेड इन इंडिया राफेल ६०% स्वदेशी असतील | २ लाख कोटींचा करार शक्य




**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलाला ११४ मेड इन इंडिया राफेल लढाऊ विमानांची आवश्यकता आहे. यासाठी लष्कराने संरक्षण मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे. त्यावर सध्या सरकार विचार करत आहे.

ही विमाने फ्रेंच कंपनी डसॉल्ट एव्हिएशन आणि भारतीय एरोस्पेस कंपन्या संयुक्तपणे तयार करतील. मेड इन इंडिया राफेल ६०% स्वदेशी असतील, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानविरुद्ध राफेलच्या शानदार कामगिरीनंतर लगेचच हा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रस्तावाची अंदाजे किंमत २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी एएनआयला सांगितले की, भारतीय हवाई दलाकडून काही दिवसांपूर्वी संरक्षण मंत्रालयाला केस स्टेटमेंट (एसओसी) किंवा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. संरक्षण आणि वित्त यासह इतर विभाग त्यावर विचार करत आहेत.

विचारविनिमयानंतर, हा प्रस्ताव संरक्षण खरेदी मंडळ आणि नंतर संरक्षण अधिग्रहण परिषदेकडे पाठवला जाईल. जर फ्रान्ससोबतचा हा करार अंतिम झाला तर तो भारत सरकारचा आतापर्यंतचा सर्वात मोठा संरक्षण करार असेल. यावरील निर्णयाची सर्व जण प्रतिक्षा करत आहेत.

### राफेल मरीन आयएनएस विक्रांतवर

भारत आयएनएस विक्रांतवर राफेल सागरी विमान तैनात करणार आहे. विमान उत्पादक कंपनी डसॉल्ट एव्हिएशनने भारताच्या गरजेनुसार या विमानांमध्ये अनेक बदल केले आहेत. यामध्ये जहाजविरोधी हल्ला, अण्वस्त्रे प्रक्षेपित करण्याची क्षमता आणि १० तास उड्डाण रेकॉर्डिंग यासारख्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. याशिवाय, कंपनी भारताला शस्त्र प्रणाली, सुटे भाग आणि विमानासाठी आवश्यक साधने देखील पुरवेल.

### जूनमध्ये, २६ राफेल मरीनसाठी करार

जूनमध्ये भारत आणि फ्रान्समध्ये २६ राफेल सागरी विमानांसाठी करार झाला होता. या करारानुसार, भारत फ्रान्सकडून २२ सिंगल सीटर विमाने आणि ४ डबल सीटर विमाने खरेदी करेल. ही विमाने अणुबॉम्ब डागण्याच्या क्षमतेने सुसज्ज असतील. वृत्तानुसार, फ्रान्ससोबत हा करार सुमारे ६३,००० कोटी रुपयांना केला जात आहे. या विमानांची डिलिव्हरी २०२८-२९ मध्ये सुरू होईल आणि सर्व विमाने २०३१-३२ पर्यंत भारतात पोहोचतील.

### लष्कराकडे असतील १७६ राफेल विमाने

११४ राफेल विमानांचा करार पूर्ण झाल्यानंतर, भारतीय लष्कराच्या तापयात राफेल विमानांची संख्या १७६ पर्यंत वाढेल. तथापि यासाठी काही वेळ जागू शकतो. भारतीय हवाई दलाने आधीच ३६ राफेल विमाने समाविष्ट केली आहेत आणि भारतीय नौदलाने २६ राफेल मरीन विमानाची ऑर्डर दिली आहे.

### फ्रान्सकडून ३६ राफेल विमाने खरेदी

राफेल मरीनच्या आधी, भारताने फ्रान्सकडून हवाई दलासाठी ३६ राफेल जेट विमाने खरेदी केली आहेत. २०१६ मध्ये झालेल्या या करारातील सर्व विमाने २०२२ मध्ये भारतात पोहोचली. ती हवाई दलाच्या अंबाला आणि हशिनारा हवाई तळांवरून चालवली जातात. हा करार ५८,००० कोटी रुपयांना करण्यात आला. राफेल मरीन विमानांची वैशिष्ट्ये हवाई दलाच्या राफेल विमानांपेक्षा अधिक प्रगत आहेत.

# अहिल्यानगर-मनमाड रस्ता रक्तरंजित, अपघातांची मालिका थांबेना!

## एकाच दिवसात तीन बळी, मृतदेह रस्त्यावर ठेवून राहुरीकरांचे आंदोलन

**राहुरी :** राहुरी महामार्गावरील खंडेराय देवस्थानाच्या समोर अहिल्यानगर-मनमाड राहूरीकरांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता रोको आंदोलन केले. महामार्गाच्या दुरुस्तीसाठी ज्या संबंधित अधिकाऱ्यांवर व ठेकेदाराबर जबाबदारी होती त्यांनी रस्त्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार करून काम अतिशय निकृष्ट प्रतीचे केल्याने सहा महिन्यांतच रस्त्याची दुरवस्था झाली. या रस्त्यावर दररोज बळी जात आहेत. तीन तास चाललेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक तीन तास ठप्प झाली होती. आआंदोलकांना संबंधित अधिकारी, ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचा मेल दाखविल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

काल सकाळी हरातील शशिकांत दुधाडे हे राहुरी विद्यापीठाकडून राहुरीकडे येत असताना खड्‌चात मोटा सायकल घसरून पडल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. त्यामुळे राहुरीकरांच्या संतापाबा उद्रेक झाला. शशिकात दुधाडे यांचा मृतदेह रस्त्यावर ठेवून अहिल्यानगर-मनमाड महामार्ग रोखण्यात आला. यावेळी तनपुरे यांनी संबंधित अधिकारी, ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. राहूरी फॅक्टरी येथे आंदोलन करणाऱ्या नऊ आंदोलकांवर गुन्हे दाखल केल्यामुळे तालुक्यातील जनतेचा उद्रेक झाला, जोपर्यंत संबंधित अधिकारी, ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत आम्ही रस्त्यावरून उठणार नाही असा पवित्रा प्राजक्त तनपुरे यांनी घेतला. अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून यासंदर्भात योग्य ती चौकशी करून अधिकारी व ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्यात येईल असा मेल आल्यानंतर तो मेल तनपुरे यांनी बघितला व आंदोलकांना त्याविषयी माहिती दिली.





तनपुरे म्हणाले की, ज्या आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले आहेत त्यांनी घाबरून जाण्याचे काम नाही. संपूर्ण तालुका तुमच्या पाठीमागे उभा राहिला आहे व आम्हीसुद्धा तुमच्या पाठीमागे भक्कमपणे उभे आहोत तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. सुमारे तीन तास चाललेल्या या आंदोलनात भावनांचा उद्रेक झालेल्या नागरिकांनी प्रशासनावर हल्लाबोल केला. दुधाळे यांचा अपघाती मृत्यू झाल्याचे समजताच माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, युवा नेते हर्ष तनपुरे, रावसाहेब चाचा तनपुरे, कांता तनपुरे, यांनी शवविच्छेदनस्थळी धाव घेतली.

रास्ता रोको आंदोलनाचा निर्णय अचानक झाल्यामुळे पोलीस प्रशासनाची दमछाक झाली. याप्रसंगी रवींद्र मोरे, पत्रकार अनिल देशपांडे, देवेंद्र लांबे, यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर लगेचच गुन्हा दाखल झाला पाहिजे व आंदोलकांवर केलेले गुन्हे मागे घेतले पाहिजे अशी मागणी केली. पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी फोनवर सविस्तर चर्चा करून १२ सप्टेंबर पासून बाभळेश्वरकडून नगरकडे येणारी जड वाहने पर्यायी मार्गान वळविण्यात आली आहे व नगरकडून मनमाड कडे जाणारी जड वाहने एमआयडीसीनजिक दूध डेअरीपासून पर्यायी मार्गानि वळविण्यात आल्याचे सांगितले.

आंदोलनात सागर तनपुरे, प्रकाश पारख, कांता तनपुरे, संतोष लोढा, भारत भुजाडी, अनिल कासार, प्रकाश भुजाडी, राजेंद्र जाधव, सुनील भट्टड, डॉ. प्रकाश पवार, विलास तरवडे, विराज धसाळ, ॲड. राहुल शेटे, सूर्यकांत भुजाडी, स्वप्निल भास्कर, अनिल येवले, गजानन सातभाई, अनिल कासार, बाळासाहेब मुंडे, मुकुंद डहाळे, विजय मोटे, किशोर दुधाडे, ओंकार कासार, प्रशांत डौले, प्रतीक तनपुरे, राजेंद्र बोरकर, नंदकुमार तनपुरे, ज्ञानेश्वर जगधने, संभाजीराजे तनपुरे, सौरभ उंडे, भाऊसाहेब बिडवे, जीवन गुलदगड, महेश उदावंत, दीपक त्रिभुवन, ज्ञानेश्वर जगधने, सचिन तनपुरे, आदिनाथ कराळे, सचिन बोरुडे, विजय उंडे, किरण कोरडे, गेनूभाऊ तोडमल, गणेश कोहकडे आदींसह हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

### रस्ता बनला मृत्यूचा सापळा

काल सकाळी झालेल्या अपघातात शशिकांत दुधाडे यांचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्या अपघातातील व्यक्तीची प्रकृती गंभीर आहे. आंदोलन सुरू असतानाच देहऱ्याजवळ पुण्यावरून येणाऱ्या दुचाकीधारकाचा अपघात होऊन त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे हा महामार्ग मृत्यूचा जूण सापळाच बनला आहे.

### आंदोलकांवर कारवाई करणार नाही

रास्ता रोका आंदोलन प्रसंगी आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले होते. त्य संदर्भात पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर यांनी सांगितले की, तुम्ही त्याचे निवेदन द्या. आम्ही आंदोलकांवर कुठलीही कारवाई करणार नाही.

# नो पीयूसी, नो फ्युएल

**मुंबई :** परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सर्व पेट्रोल पंपांवर नो पीयूसी... नो फ्युएल उपक्रम कठोरपणे लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. या उपक्रमाअंतर्गत, वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र नसलेल्या कोणत्याही वाहनाला इंधन दिले जाणार नाही.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सीसीटीव्ही स्कैनिंग प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने इंधन भरण्यासाठी येणाऱ्या वाहनांचा क्रमांक स्कॅन केला जाईल. पीयूसी तपासणी : स्कॅन केलेल्या क्रमांकावरून त्या वाहनाचे पीयूसी प्रमाणपत्र वैध आहे की नाही, हे तपासले जाईल.


इंधन नाही : पीयूसी प्रमाणपत्र वैध नसेल, तर त्या वाहनाला इंधन दिले जाणार नाही. जागेवरच पीयूसीची सोय : वाहनचालकांची गैरसोय टाळण्यासाठी, त्याच पेट्रोल पंपावर तात्काळ पीयूसी प्रमाणपत्र काढून देण्याची व्यवस्था केली जाईल. प्रत्येक युनिक आयडी पीयूसी प्रमाणपत्राला एक युनिक आयडेंटिटी दिली जाईल, ज्यामुळे त्याची वैधता वेळोवेळी तपासता येईल. या बैठकीत सरनाईक यांनी अवैध मार्गाने पीयूसी प्रमाणपत्र देणाऱ्या टोळ्यांवर धडक कारवाई करण्याचे आदेशही दिले. भविष्यात वाहन विक्री करणारे शोरूम्स आणि गॅरेजेसमध्येही पीयूसी प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केली जाईल, जेणेकरून रस्त्यावरील प्रत्येक वाहनाकडे वैध प्रमाणपत्र असेल आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

# दक्षिण चीन समुद्रात पुन्हा तणाव

**नवी दिल्ली :** दक्षिण चीन समुद्र हे एक वादग्रस्त क्षेत्र आहे. त्याच्या ताब्यावरून चीन, तैवान, फिलिपाईन्स, व्हिएतनाम, मलेशिया आणि ब्रुनेई यांच्यात गेली अनेक वर्ष वाद सुरू आहे. आता चीनने दक्षिण चीन समुद्रातील स्कारबोरो शोल येथे नैसर्गिक संरक्षित क्षेत्र तयार करण्याची योजना जाहीर केली आहे. फिलिपाइन्सने यावर तीव्र टीका केली आहे. चीन या धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या सागरी क्षेत्रावरील आपले नियंत्रण वाढवण्यासाठी पर्यावरणीय संरक्षणाचा बहाणा पुढे करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# भारताला विसरून, पाकिस्तानशी संबंध प्रस्थापित करावेत

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प यांची भारताबाबतची भूमिका नरमली आहे. अशात पाकिस्तानचे माजी सुरक्षा सल्लागार डॉ. मोईद युसूफ यांनी अमेरिकेने



भारताला विसरून, आता पाकिस्तानशी संबंध प्रस्थापित करावेत, असे आवाहन केले आहे.

फॉरेन अफेयर्स मासिकातील एका लेखात डॉ. युसूफ यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अमेरिकेची भारतातील दीर्घकालीन धोरणात्मक गुंतवणूक अयशस्वी ठरली आहे. युसूफ यांनी अमेरिकेला त्यांच्या दक्षिण आशिया धोरणाचा पुनर्विचार करण्याचे आणि पाकिस्तानसोबत अधिक संतुलित भागीदारी करण्याचे आवाहन केले आहे. अमेरिकेची पाकिस्तानबरोबरची भागीदारी प्रादेशिक स्थिरतेला प्रोत्साहन देईल आणि यामुळे अमेरिका व चीनमधील तणाव कमी होण्यास देखील मदत होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

# भारतावर टॅरिफ लादणे हे ''सोपे काम नाही'' : ट्रम्प

**नवी दिल्ली :** अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्याने दोन्ही देशांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या टॅरिफमुळे दोन्ही देशांच्या संबंधांवर काय परिणाम झाले यावर भाष्य केले आहे. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर टॅरिफ लादणे हे ''सोपे काम नाही'' कारण त्यामुळे दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला आहे.

''भारत त्यांचा (रशिया) सर्वात मोठा ग्राहक आहे. मी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादला कारण ते रशियाकडून तेल खरेदी करत आहेत. भारतावर टॅरिफ लादले सोपे काम नाही. हे खूप मोठे काम आहे आणि त्यामुळे भारतासोबत मतभेद निर्माण झाले आहेत. पण मी हे काम आधीच केले आहे. मी खूप काही केले आहे. लक्षात ठेवा की, ही आपल्या समस्येपेक्षा युरोपची समस्या आहे'', असे शुक्रवारी फॉक्स अँड फ्रेंड्सला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प म्हणाले.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी पुन्हा एकदा त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अनेक जागतिक संघर्ष सोडवल्याचा दावा केला. ''मी सात युद्धे थांबवली आहेत. ज्यात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्षाचाही समावेश आहे. परंतु कांगो आणि रवांडा यांच्यातील युद्ध मोठे होते. मी ते सुद्धा सोडवले. ते ३१ वर्षांपासून चालू होते. यामध्ये, लाखो लोक मारले गेले, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, ऊर्जा खरेदी राष्ट्रीय हित आणि बाजारपेठेच्या गतिशीलतेनुसार होते, असे म्हणत भारताने रशियन कच्च्या तेलाच्या खरेदीचे समर्थन केले आहे.

भारताचा मध्यमवर्ग अमेरिकेसाठी महत्त्वाचा

तत्पूर्वी, अमेरिकेचे भारतातील पुढील राजदूत म्हणून नामांकित केलेले सर्जियो गोर यांनी गुरुवारी म्हटले होते की, ''संपूर्ण अमेरिकेपेक्षा मोठी मध्यमवर्गीय बाजारपेठ असलेल्या भारताने अमेरिकन कच्चे तेल आणि तेल उत्पादनांची खरेदी करावी, असे ट्रम्प प्रशासनाला वाटते.''

पान १ वरून

### ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे आरक्षण जाहीर

म्हणजेच या ठिकाणी सर्वपक्षीय स्पर्धा टोकाला जाणार यात शंका नाही. तर सातारा, धुळे, जालना, धाराशिव, रत्नागिरी अशा अनेक ठिकाणी नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) तर बीड, परभणी, वर्धा, चंद्रपूर येथे अनुसूचित जाती, तर नंदूरबार, अकोला, वाशिम, अहिल्यानगर येथे अनुसूचित जमातींसाठी आरक्षण दिले आहे. त्यातही विशेष म्हणजे यंदा अनेक जिल्ह्यांत महिला प्रवर्गाला मोठा कोटा मिळाला आहे.

अहिल्यानगरमधील हे धक्कादायक आरक्षण सध्याच्या राजकीय नेतृत्वासाठी कसोटीचा क्षण आहे. जिल्ह्यातील मोठ्या राजकीय पक्षांना आता अनुसूचित जमाती महिला नेतृत्व उभं करावं लागणार आहे. स्थानिक पातळीवर पात्र उमेदवार शोधणे आणि तिला निवडून आणणे ही मोठी डोकेदुखी ठरणार आहे. उलटपक्षी, अनुसूचित जम ाती समाजासाठी ही सुवर्णसंधी आहे. आतापर्यंत दुर्लक्षित असलेला हा समाज मुख्य प्रवाहात येऊन निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचा ठरणार आहे.आरक्षणाने बदललेलं समीकरण या आरक्षण जाहीरनाम्यातून स्पष्ट होतं की, शासनाने सामाजिक न्यायाची तत्त्वं अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांना मोठी संधी देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्री नेतृत्व बळकट होणार आहे. मात्र दुसरीकडे काही जिल्ह्यांत अनपेक्षित आरक्षणामुळे पारंपरिक राजकीय गटांना मोठा धक्का बसला आहे.

अनेक ठिकाणी सर्वसाधारण प्रवर्गातील दिग्गज नेत्यांची गादी सरकली आहे, तर ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गातील उमेदवारांसाठी दारे खुली झाली आहेत. यामुळे उमेदवारी अर्ज, बंडखोरी, गटबाजी आणि पक्षीय रणनीतींना नव्या उंचीवर नेणार हे निश्चित आहे.

या आरक्षण घोषणेमुळे स्थानिक राजकारणातील स्पर्धा आणखी चुरशीची होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात आता योग्य उमेदवार शोधण्याची स्पर्धा सुरू होईल. महिला उमेदवारांना प्राधान्य दिलं गेल्यामुळे घराघरातल्या कार्यकर्त्या, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रिया आणि नव्या चेहऱ्यांना राजकारणात वाव मिळणार आहे. मात्र या प्रक्रियेत स्थानिक पातळीवर कुटुंबीय वंशवाद, बाहेरून नेत्यांना आणण्याचे प्रयोग आणि बंडखोरीचे संकटही डोकं वर काढणार आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षपदाचं आरक्षण ही फक्त प्रशासनिक बाब नाही; तर ती स्थानिक नेतृत्वनिर्मितीची प्रयोगशाळा आहे. या घोषणेमुळे महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर नवं चित्र उभं राहणार आहे. अहिल्यानगरसारख्या ठिकाणी आरक्षणामुळे निर्माण झालेली धक्का लाट अनेक गटांना अस्वस्थ करत असली, तरी हाच धक्का नव्या नेतृत्वाच्या उदयाला कारणीभूत ठरू शकतो. आता खरी परीक्षा आहे ती राजकीय पक्षांचीते खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय पाळणार का, की आरक्षणाला

### मतांची चोरी करुन जिंकले!

विशेष म्हणजे बालियान यांना केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे चाणक्य मानल्या जाणाऱ्या अमित शहांचा पाठिंबा होता. त्यामुळे भाजपचे आजी-माजी खासदार त्यांना एकगठ्ठा मतदान करतील, असा अनेकांचा होरा होता. पण तरीही रुडी यांनी बालियान यांचा पराभव केला. गेल्या महिन्यात ही निवडणूक झाली. मात्र महिन्याभरानंतरही रुडी विरुद्ध बालियान संघर्ष थांबलेला नाही. त्यामुळे भाजपसाठी अडचण वाढली आहे.

### नेपाळमध्ये राजकीय उलथापालथ; कार्की नव्या पंतप्रधान

पौडेल यांनी नेपाळच्या तिन्ही प्रमुख राजकीय पक्षाच्या प्रमुखांना बोलावून प्रतिनिधी सभा बरखास्त करत असल्याचे सांगितले. तसेच, सुशीला कार्की ह्या अंतरिम पंतप्रधानपदाची शपथ घेतील, अशी घोषणाही त्यांनी केली होती. त्यानुसार, सुशीला कार्की यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून राष्ट्रपतीकडून त्यांचा शपथविधी संपन्न होत आहे. सुशीला कार्की ह्या माजी सरन्यायाधीश असून देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान ठरल्या आहेत. नेपाळच्या पंतप्रधानपदासाठी दिवसभर झालेल्या प्रतिनिधी सभेतून अखेर सुशीला कार्की यांच्या नावावर सर्वांचे एकमत झाल्यानंतर नेपाळच्या नव्या पंतप्रधानांच्या नावाची घोषणा झाली. अंतरिम पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर आंदोलकांच्या मागण्यांची पूर्तता करत त्या पुन्हा निवडणुकांसाठी सज्ज होतील. त्यानंतर, नेपाळमध्ये निवडणुका होऊन नव्याने सरकार स्थापन होईल.

### मराठा-कुणबी आरक्षणाला हायकोर्टात आव्हान

हैदराबाद गॅझेटला विरोध करणाऱ्या एक नव्हे तर २ याचिका मुंबई हायकोर्टात दाखल झाल्या आहेत. यातील एक याचिका शिव अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेने ड. सतीश तळेकर यांनी केली आहे, तर दुसरी याचिका व्यवसायाने वकील असलेले विनीत धोत्रे यांनी दाखल केली आहे. राज्य सरकारने हैदराबाद गंडोट लागू करणार असल्याचा जो जीआर काढला आहे तो पूर्णपणे बेकायदा असल्याने रद्द करावा, याचिका प्रलंबित असेपर्यंत या अधिसूचनेची अंम लबजावणी करू नये व त्याद्वारे कोणालाही कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, अशी अंतरिम मागणी याचिकांद्वारे करण्यात आली आहे. या याचिकांवर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

मराठा आणि कुणबी एकच नसल्याचे व मराठा समाज आर्थिक व सामाजिक म ागास नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट करूनही राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सरकारचा निर्णय सर्वो च्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन करणारा आहे. अशाप्रकारे मराठा समाजाला ओबीसींमध्ये समाविष्ट करून सरकार ओबीसींची संधी हिरावून घेत आहे. जरांगे यांच्या दबावाला बळी पडून सरकारने ही अधिसूचना काढली आहे असे याचिकेत म्हटले आहे.

दरम्यान, धाराशिव जिल्ह्यासह अनेक ठिकाणी मराठा समाजातील अर्जदारांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी गावपातळीवर समित्या गठीत करण्यात येत आहेत. या समित्यांमध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश आहे. प्रमाणपत्रासाठी अर्जदारांनी मराठा समाजातील भुधारक, भूमि हीन शेतकरी किंवा बटाईदार म्हणून जमीन शेती करत असल्याचे पुरावे सादर करणे आवश्यक राहणार आहे.

### मराठा समाजाला गॅझेट लागू केल्याने तरुणाची आत्महत्या

या घटनेमुळे संपूर्ण मराठवाड्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, त्यांनी आजचे येवला मतदारसंघातील सर्व नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत. ते विशेष विमानाने सकाळी १० वाजता नाशिकहून लातूरला रवाना होणार आहेत.

छगन भुजबळ यांनी ट्वीट करत म्हटलं की, ''लातूर जिल्ह्यातील वांगदरी (ता. रेणापूर) येथील भरत महादेव कराड या ३५ वर्षीय तरुणाने ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या नैराश्यातून मांजरा नदीपात्रात उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना मन सुन्न करणारी आहे. त्यास भावपूर्ण श्रद्धांजली! या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर उद्या शुक्रवार रोजी लातूर येथे या आत्महत्याग्रस्त कराड कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करण्यासाठी जात आहे. सध्या ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात घडणाऱ्या घडामोडी सर्वसामान्य ओबीसीला अस्वस्थ करणाऱ्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. पण संविधान आणि कायद्यामुळे नक्की न्याय मिळेल,त्यासाठी लढावं लागणार आहे. त्याला आपण खंबीर आहोत. त्यामुळे कृपया कोणीही असे टोकाचे पाऊल उचलू नये, असे महाराष्ट्रातील समस्त ओबीसी बांधवांना माझे कळकळीचे आवाहन आहे.''

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**


| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com
Digital India
Vision India
MAKE IN INDIA
MSME
Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# सिडको जमीन घोटाळा प्रकरणाची चौकशी होणार

## एसआयटी स्थापन; ५ हजार कोटींच्या वनजमीन घोटाळा प्रकरण । रोहित पवारांकडून स्वागत

जामखेड : राज्यातील सरकारी वनजमिनी बळकवल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एसआयटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय म्हणजे सिडको जमीन घोटाळ्यात महत्वपूर्ण पाऊल असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले आहे.

याप्रकरणी पाठपुरावा करणारे स्थानिक भूमिपुत्र तसेच कॉन्शियस सिटीझन फोरम यांसारख्या सामाजिक संघटनांचे हे वश असून सर्वांचेच रोहित पवारांनी अभिनंदन केले आहे. नवी मुंबईतील सिडकोकडून ५ हजार कोटी रुपयांच्या वनजमीन घोटाळा प्रकरणाची देखील एसआयटीकडून चौकशी होणार आहे. आमदार रोहित पवार यांच्याकडून मुख्य सचिव राजेशकुमार मीना यांची भेट घेतल्यानंतर तत्काळ राज्य सरकारच्या वन विभागाकडून एसआयटी स्थापन करण्यात आली आहे.

आम्ही सादर केलेले तब्बल १२ हजार पानांचे पुरावे, सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चाधिकार समितीने राज्याच्या मुख्य सचिवांना चौकशी करण्याबाबतचं लिहिलेलं पत्र आणि आता राज्य सरकारने एसआयटी स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय अशाप्रकारे चोहोबाजूने मजबूत सापळा लागत आहे. परंतु मागील काळात वेगवेगळ्या प्रकरणात स्थापन झालेल्या एसआयटीचा इतिहास बघता केवळ वेळ मारुन नेण्याचे प्रकार झाले



आहेत. मात्र या प्रकरणात भ्रष्टाचारी मंत्र्याला कितीही संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला तरी आम्ही कोणत्याही भ्रष्ट माशाला या प्रकरणातून सुटू देणार नाही. आरोपी नंबर २ बिवलकर महाराष्ट्रातच असून लवकरच देश सोडणार असल्याबी माहिती आहे. त्यामुळं बिवलकर देशाबाहेर पळून जाण्यापूर्वी लुकआउट नोटीस देऊन अटक करणे गरजेचं आहे. आम्ही एवढी स्पष्ट माहिती देऊनही उद्या बिवलकर देशाबाहेर गेल्यास राज्याचे मुख्यमंत्री त्यासाठी पूर्णपणे जबाबदार असतील असे रोहित पवार यांनी म्हटलं आहे. उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी राज्याला ओरबाडून खाणाऱ्या या भ्रष्ट मंत्र्यांचा राजीनामा घेऊन भ्रष्टाचारी मंत्र्यांची गय केली जाणार नाही हे मुख्यमंत्री दाखवून देतील का? की अशा भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून पुन्हा राज्याला लुटायला मोकळं सोडतील ? असा सवाल रोहित पवार यांनी केलाय. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाची महाराष्ट्र वाट बघत आहे. असो, काहीही झालं तरी हा विषय आपण म र्गी लावणारच, त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांनी आणि कुळधारकांनी कुठलीही काळजी करू नये असे रोहित पवार म्हणाले.

# महाराष्ट्राच्या राज्यपालपदी आचार्य देवव्रत यांची नियुक्ती

**मुंबई :** उपराष्ट्रपतीपदी सीपी राधाकृष्णन यांची निवड झाली. ते महाराष्ट्राचे राज्यपाल होते. महाराष्ट्राचे राज्यपालांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. आता त्या जागी आचार्य देवव्रत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत आता महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार स्वीकारणार आहेत. राष्ट्रपती भवनाने गुरुवारी ही माहिती दिली. सी.पी. राधाकृष्णन यांची भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला आहे. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांची महाराष्ट्राचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. आचार्य देवव्रत हे त्यांच्या सध्याच्या जबाबदाऱ्यांसह महाराष्ट्राच्या राज्यपालपदाच्या जबाबदाऱ्या पार पाडतील.

# आरक्षणाठी धाराशिवमधील युवकाची आत्महत्या

**धाराशिव :** मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू केल्यानंतर त्याच गॅझेटप्रमाणे बंजारा समाजाला अनुसूचित जमातींमधून आरक्षण द्या अशी मागणी होत आहे. या मागणीसाठी धाराशिवमधील मुरुम गावच्या युवकाने सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली. पवन गोपीचंद चव्हाण असं ३२ वर्षीय युवकाने नाव असून तो पदवीधर बेरोजगार आहे. मयत तरुणाच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन मुलं असं कुटुंब आहे.

बंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेट प्रमाणे आरक्षण मिळावे असा आशयाची सुसाईड नोट मयत युवकाने लिहून ठेवली आहे.

## त्यांना किमान ५ टक्के सूट द्यावी : गडकरी

**मुंबई :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले की, जर सर्व ९७ लाख अयोग्य आणि प्रदूषणकारी वाहने स्क्रैप केली तर केंद्र आणि राज्य सरकारांना वस्तू आणि सेवा करातून ४०,००० कोटी रुपयांपर्यंतचे उत्पन्न मिळू शकेल. नवीन वाहन खरेदी करताना स्क्रॅपेज प्रमाणपत्र सादर करणाऱ्या ग्राहकांना किमान ५ टक्के सूट द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# पैसे देऊन माझ्याविरुद्ध सोशल मीडियावर राजकीय मोहीम

## इथेनॉल वरून नितीन गडकरींचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली :** पैसे देऊन माझ्याविरुद्ध सोशल मीडियावर राजकीय मोहीम चालवली जात असल्याचा गंभीर आरोप केंद्रीय परिवहन आणि रस्ते महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केला आहे. गडकरी म्हणाले की, ई२० मिश्रणाविरुद्धची सोशल मीडिया मोहीम ही राजकीयदृष्ट्या मला लक्ष्य करण्यासाठी पैसे देऊन केलेली मोहीम आहे.



ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याबाबतच्या निर्णयावरून सुरु असलेल्या चर्चेबद्दल गडकरी बोलत होते. गडकरी यांनी सांगितले की, ऑटोमोबाईल उत्पादक आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (ठख) सारख्या संस्थांनी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याबाबत त्यांचे निष्कर्ष शेअर केले आहेत. तुमचा उद्योग ज्या पद्धतीने काम करतो, तसेच राजकारणही करते. सोशल मीडिया मोहीम पैसे देऊन करण्यात आली होती; ती मला राजकीयदृष्ट्या लक्ष्य करण्यासाठी होती. त्यात काहीही तथ्य नाही; सर्व काही स्पष्ट आहे. (इथेनॉल मिश्रण) आबात पर्याय. किफायतशीर. प्रदषणमक्त आणि स्वदेशी आहे, असे गडकरी म्हणाले. गडकरी पुढे म्हणाले की भारत जीवाश्म इंधन आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करतो आणि विचारले की जीवाश्म इंधन आयात कमी करण्याचा प्रयत्न करणे आणि भारतीय अर्थव्यवस्थेत वाचवलेले पैसे घालणे हे आर्थिकदृष्ट्या चांगले पाऊल नाही का. आम्ही मक्का (मका) पासून इथेनॉल मिळवले. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना ४५ हजार कोटी रुपये मिळाले आहेत, असे ते म्हणाले.


## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


# पाकिस्तानबरोबर क्रिकेट म्हणजे दहशतवादी हल्ला

मुंबई : आशिया चषक २०२५ च्या स्पर्धेत १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना खेळवण्यात येत आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिल्यांदाच सामना होत आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रद्द करण्यात यावा, अशी विरोधकांकडून मागणी करण्यात येत आहे. शिवसेना ठाकरे गटाने देखील आक्रमक पवित्रा घेत भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पाकिस्तानबरोबर क्रिकेट सामना म्हणजे पहलगामनंतरचा आणखी एक भयंकर दहशतवादी हल्ला आहे. हा राष्ट्रद्रोहच आहे, अशी टीका शिवसेनेचं मुखपृष्ठ असलेल्या दैनिक सामनातून केली आहे. जावेद मियांदाद पाकिस्तानी क्रिकेटची वकालत करण्यासाठी मातोश्रीवर पोहोचला तेव्हा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी त्याला तोंडावर सांगितले, ''जोपर्यंत कश्मीरात हिंदूंचे रक्त तुम्ही सांडत आहात तोपर्यंत पाकिस्तानबरोबर क्रिकेट होणार नाही. दहशतवाद आणि क्रिकेट एकत्र चालणार नाही,'' असे ठणकावून सांगणारे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कुठे आणि पाकिस्तानशी क्रिकेटची सलगी करणारे आजचे नकली हिंदुत्ववादी कोठे? भारताचा स्वाभिमान आणि कुंकवाच्या प्रतिष्ठेसाठी जनतेला लढावेच लागेल, असं शिवसेनेचं मुखपृष्ठ असलेल्या दैनिक सामनातून म्हटलं आहे. भारतात मोदींचे राज्य आल्यापासून सोयीनुसार हिंदुत्व आणि सोयीच्या राष्ट्रवादास उभारी मिळाली आहे. देशभक्ती वगैरे गोष्टी फक्त निवडणुका आणि मतांपुरत्याच उरल्या आहेत. तसे नसते तर १४ सप्टेंबरला होणाऱ्या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यास हिरवा कंदिल दाखवून पहलगाम हल्ल्यातील जखमांवर मीठ चोळण्याचा प्रकार झाला नसता. कसला काय तो एशिया चषक दुबईत होत आहे. १४ सप्टेंबरला भारत-पाकिस्तान टी-२० क्रिकेट सामना तेथे निर्लज्जपणे खेळवला जात आहे. भारताने पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळू नये ही जनभावना आहे. पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या रक्ताचे पाट कश्मीर खोऱ्यात वाहिले. ते रक्त अद्याप सुकलेले नाही. २६ मायभगिनींच्या डोळ्यात आजही अश्रूंच्या थारा वाहत आहेत. मृतांची मुलेबाळे, मित्र परिवार धक्क्यातून सावरलेले नाहीत. पाकिस्तानने हा दहशतवादी हल्ला घडवला. त्यामुळे भारतीय लोकांत पाकड्यांविषयी कमालीचा संताप असताना जागतिक आणि आंतरराष्ट्रीय नियम वगैरे सांगत मोदी सरकारने भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यास परवानगी दिली. खरे म्हणजे पहलगाम हल्ल्यानंतर लगेच एक प्रखर हिंदुत्वाची बात याच मंडळींनी समोर आणली होती ती म्हणजे ''पहलगाममध्ये जे अतिरेकी घुसले व पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार करत २६ जणाचे बळी घेतले तेथे प्रत्येकाला धर्म विचारून मारण्यात आले.'' हा प्रकार भयंकरच आहे, पण मग आता दुबईत जो भारत-पाक क्रिकेट सामना होत आहे

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021